कृष्णा एक्सप्रेस
www.krishnaexpress.in
23 Aug 2025 - Page 2

# ईसीएचएस पॉलिक्लिनिकमध्ये सायबर जनजागृती कर्नल नितीन शिंगरे यांची उपस्थिती



कराड - वाढत्या सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती करण्यासाठी ईसीएचएस पॉलिक्लिनिक, कराड येथे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत सायबर जनजागृती सत्र आयोजित करण्यात आले. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि क्विक हील यांच्या संयुक्त विद्यमान हे सत्र महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स क्लबने घेतले.

या सत्राचे नेतृत्व समन्वयक डॉ. प्रियंका शिंदे, क्लबमधील प्रतिक गुंजाळकर, अनुराग वझरकर यांनी केले. उपस्थितांना सायबर गुन्हे, फसवणूक करणारे संदेश, सिम-स्वॅप घोटाळे, डीपफेक व्हिडिओ, एआय व व्हॉइस क्लोनिंग यांसारख्या वाढत्या धोक्यांबद्दल माहिती दिली. तसेच क्विक हील अँटी फ्रॉड.एआयसारख्या तंत्रज्ञानाची माहिती देऊन, ऑनलाईन व्यवहारात आवश्यक खबरदारी कशी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. ईसीएचएस पॉलिक्लिनिकचे प्रभारी अधिकारी कर्नल नितीन शिंगरे उपस्थित होते. त्यांनी सायबर सुरक्षेचे वाढते महत्त्व अधोरेखित करताना अशा सत्रांचे कौतुक केले. डिजिटल जगात सुरक्षित राहण्यासाठी सजगता हाच सर्वोत्तम मार्ग आहे. असे त्यांनी सांगितले. प्रतिक गुंजाळकर व अनुराग वझरकर यांचा सन्मान करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शेवटी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात स्थापन झालेला सायबर वॉरियर्स क्लब प्राचार्य डॉ. एस. जे. वाघ व समन्वयक डॉ. प्रियंका शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे कार्यरत असल्याचे नमूद करण्यात आले.